**जा.क्र./पोआ/६६६९/२०२२**

**(मनाई आदेश)**

पोलीस आयुक्त,पिंपरी चिंचवड, यांचे
कार्यालय, दिनांक :- ०६.०८.२०२२

**<u>विषय</u> :- महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)(३)प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश.**

**१/-** ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणु (कोविड -१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७, दि.१३.०३.२०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केली आहे तसेच मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांनी दिनांक १३.०३.२०२० रोजीचे आदेशान्वये आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना केली आहे. सद्या १० मार्च २०२२ रोजी पासुन पुढील आदेशापर्यंत **कोरोना विषाणू (कोविड-१९) संसर्ग साखळी तोडण्यासाठी "** Levels of Restrictions for Break The Chain **" प्रतिबंधात्मक आदेश** लागु करण्यात आले आहेत, पिंपरी चिंचवड शहरात जनतेच्या मागण्यांसाठी तसेच मराठा, ओबीसी व राजकीय आरक्षणाच्या अनुषंगाने विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना या मोर्चे, धरणे, निदर्शने, बंद पुकारणे व तसेच सद्यस्थितीत राजकीय अस्थिरता निर्माण झालेने, समाजामध्ये गोंधळाचे वातावरण आहे. तसेच दिनांक ०९.०८.२०२२ रोजी मोहरम (ताजिया),जागतिक आदिवासी दिन, दिनांक ११.०८.२०२२ रोजी नारळी पोर्णिमा, रक्षाबंधन, दिनांक १३.०८.२०२२ पुण्य श्लोक अहिल्याबाई होळकर पुण्यातीथी (तारखेप्रमाणे)दिनांक १५.०८.२०२२ रोजी स्वतंत्र्य दिन, दिनांक १६.०८.२०२२ रोजी पारसी नववर्ष दिन, दिनांक १८.०८.२०२२ रोजी श्री कृष्णजन्माष्टमी, दिनांक १९.०८.२०२२ रोजी दहिहंडी (गोपाळकाला) असे दिन, तसेच पुण्यतिथी व उत्सव साजरे करण्यात येणार आहेत. या कालावधीत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये. याकरीता पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रामध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्याचे दृष्टीकोनातून महाराष्ट्र पोलीस अधिनियम, सन १९५१ चे कलम ३७ (१) (३) चे अंमल जारी करणे आवश्यक आहे.

**२/-** आणि ज्याअर्थी, माझी खात्री झाली आहे की, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात शांतता व सुव्यवस्था राखणेकामी महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन-१९५१ च्या कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश करणेस पुरेसे व सबळ कारण आहे.

**३/-** त्याअर्थी, **मी अंकुश शिंदे, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड** वर नमूद अ.नं.२ च्या आदेशान्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून व महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन-१९५१ च्या कलम ३७ (१) व (३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात **तरी दिनांक ०८.०८.२०२२ रोजी ००.०१ वा.पासून ते दिनांक २१.०८.२०२२ रोजी २४.०० वा. पर्यंत या १४ दिवसांसाठी** खालील नमूद केलेली कृत्ये करण्यास या आदेशान्वये मनाई करीत आहे.

**अ)** कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ, ज्वलनशील द्रव पदार्थ बरोबर नेणे.
**ब)** दगड अथवा शस्त्रे किंवा अस्त्रे, सोडावयाची अस्त्रे किंवा फेकावयाची हत्यारे अगर साधने तसेच काचेचे तुकडे व काचेच्या रिकाम्या बाटल्या बरोबर नेणे, जमा करणे व तयार करणे.
**क)** शस्त्रे, सोटे, भाले, चाकु,सुरा,कोयता, तलवारी, दंड, काठया, बंदुका व शारीरिक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे.
**ड)** कोणत्याही इसमाचे चित्राचे,प्रतिकात्मक प्रेताचे,पुढायांच्या चित्राचे, प्रतिमेचे प्रदर्शन व दहन करणे.
**इ)** मोठ-मोठयाने अर्वाच्य घोषणा देणे, वाद्य वाजविणे.
**फ)** यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहचेल किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा

राज्य उलथवून देण्यास प्रवृत्त करेल अशी आवेशपुर्ण भाषणे करणे किंवा आविर्भाव करणे, कोणतेही जिन्नस तयार करून त्याचा जनतेत प्रसार करणे या कृत्यावर बंदी घालीत आहे.

**ग)** ज्यायोगे वरील परिसरात कायदा व सुव्यवस्था धोक्यात येईल अशा पद्धतीने महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन-१९५१ च्या कलम ३७ (१) व (३) विरूध्द वर्तन करणे.

४/-महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन-१९५१ च्या कलम ३७ चे पोटकलम (३) पाच किंवा पाच पेक्षा जास्त लोकांचा जमाव करण्यास पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे पुर्व परवानगी शिवाय सभा घेणेस किंवा मिरवणुक काढणेस बंदी घालीत आहे.

५/-जमावबंदीचे आदेश हे लग्नकार्य, धार्मिकविधी, प्रेतयात्रा, इत्यादी कारणांकरीता लागू राहणार नाही.

६/-वरील संपूर्ण आदेश हा शासनाच्या सेवेतील व्यक्तींना व ज्यांना आपल्या वरिष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्यपुर्तीसाठी हत्यार बाळगणे आवश्यक आहे त्यांना लागू होणार नाही.

७/-सदरचे आदेशाची जाहिररीत्या ठळक प्रसिध्दी करावी.

८/-या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधीत व्यक्ती महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन-१९५१ चे कलम १३५ प्रमाणे शिक्षेस पात्र होईल.

सदरचा आदेश माझे सही शिक्क्यानिशी आज दिनांक ०६.०८.२०२२ रोजी दिलेला आहे.